पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३७  • जानेवारी २०१४  • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## विविध क्रीडा स्पर्धांचे शानदार उद्घाटन

कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये सभासद सेवकांमधील कलागुणांना वाव देवून परस्परांमध्ये समन्वय साधण्यासाठी दिनांक १६ ते २४ जानेवारी, २०१४ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे (क्रिकेट, व्हॉलिबॉल, कबड्डी, बुध्दिबळ, कॅरम, १०० मिटर धावणे, थ्रो बॉल, संगित खुर्ची, टेबल टेनिस, बॅडमिंटन, गोळाफेक) आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दिनांक १६/१/१४ रोजी सकाळी १० वाजता पं.नेहरु स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला होता. या उद्घाटन समारंभामध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झालेले सर्व खेळाडू उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) हे उपस्थित होते. तसेच मा. आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन, मा. श्रीनिवास कंदुल, उप आयुक्त (विद्युत), मा. मनोज पिंगळे, माजी बॉक्सिंग नॅशनल चॅम्पियन, मा. सुबोध देशपांडे, माजी टेबल टेनिस नॅशनल चॅम्पियन, मा. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम, मा.मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये कामगार कल्याण निधीतर्फे सालाबादप्रमाणे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यामागील उद्देश विषद करुन या वर्षीही मोठ्या संख्येने सेवकांनी सहभाग घेतल्याबद्दल श्री. दौंडकर यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच, कामगार कल्याण निधीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत माहिती दिली व कामगार कल्याण निधी हा सेवकांचा असल्याने सर्व सेवकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. तदनंतर उद्घाटनपर मार्गदर्शनामध्ये शारिरीक आणि मानसिक आरोग्य सदृढ ठेवून कामकाजातील गुणवत्ता वाढविण्यासाठी खेळ हे महत्वाचे साधन आहे. तसेच, कोणत्याही खेळाने खेळाडूमध्ये एकाग्रता व कार्यक्षमता वाढीस मोठ्या प्रमाणावर मदत होते. त्यामुळे जास्तीत जास्त सेवक/अधिकारी यांनी खेळामध्ये सहभागी व्हावे, असे मा. जगताप यांनी स्पष्ट केले. तसेच, पुणे महानगरपालिकेतील सेवकांसाठी क्रीडा समितीमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यांचाही सर्व सेवकांनी लाभ घ्यावा. जे खेळाडू किंवा संघ आंतरराज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत अशा खेळाडू व संघांनी आपली नावे क्रीडा प्राधिकाऱ्यांकडे नोंदणी करुन घ्यावीत. जेणेकरुन त्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्यामध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत. क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सांख्यिकी आणि अग्निशमन विभाग यांच्यातील क्रिकेट सामन्याची नाणेफेक करुन सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले. स्पर्धांच्या आयोजनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयातील श्री. धनंजय पागे, श्री. प्रशांत राजपुरे, श्री. रघुनाथ गेजगे, श्री. अश्विन शिंदे, श्री. शरद मरकड, यांनी विशेष परिश्रम घेतले.




## बुध्दिबळ स्पर्धेत विष्णू इंदापूरकर सर्वोत्तम

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक १७ व १८ जानेवारी, २०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे बुध्दिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ११ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १७/१/२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आला. उद्घाटन समारंभ प्रसंगी श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी व श्री. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये श्री. विष्णू इंदापूरकर, अतिरिक्त कार्यालय अधिक्षक, नगरसचिव कार्यालय यांनी प्रथम क्रमांक, श्री. अमोल पुंडे, कनिष्ठ अभियंता, धनकवडी क्षेत्रीय कार्यालय यांनी द्वितीय क्रमांक व श्री. रेवनकुमार रासगे, पाणीपुरवठा विभाग यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. जितेंद्र बागे व श्री. पांडुरंग अडसुळ यांनी काम पाहिले.

## कॅरम स्पर्धेत नांगरे व शिंदे विजयी

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये दिनांक १७ व १८ जानेवारी, २०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कॅरम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ३५ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १७/१/२०१४ रोजी सकाळी १० वाजता झाला. या स्पर्धेमध्ये पुरुष गटामध्ये श्री. सागर नांगरे यांनी प्रथम क्रमांक व श्री. बाळू गायकवाड यांनी द्वितीय तर श्री. अरुण चांदणे यांनी तृतीय क्रमांकपटकाविला. महिला गटामध्ये श्रीमती वैशाली शिंदे यांनी प्रथम, श्रीमती रजनी कराडे यांनी द्वितीय व श्रीमती अश्विनी राजगुरव यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. सय्यद वाहिद व श्री. अरुण चांदणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## भाडळे, एकबोटे व इधाटे टेबल टेनिसमध्ये विजेते

कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक २० व २१ जानेवारी, २०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन मा. श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. मा.केंजळे यांनी टेबल टेनिस हा खेळ सर्व कर्मचाऱ्यांनी खेळणे आवश्यक आहे. कारण टेबल टेनिसमुळे कामामध्ये लागणारी एकाग्रता, शारीरीक स्वास्थ्य व मनाचा कणखरपणा प्राप्त होण्यास मदत होते. कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेवून खेळाचा आनंद घेतला पाहिजे, असे नमूद केले.

ही स्पर्धा एकेरी व दुहेरी अशा दोन स्तरांवर घेण्यात आली. तसेच, महिला सेविकांसाठीही ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पुरुष एकेरीमध्ये श्री. रविंद्र भाडळे यांनी प्रथम, श्री. दिपक एकबोटे यांनी द्वितीय तर श्री. चेतन जोग यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.दुहेरी स्पर्धेमध्ये श्री. रविंद्र भाडळे व श्री. दिपक एकबोटे यांनी प्रथम व श्री. चेतन जोग व श्री.अमोल पुंडे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

तसेच, महिला एकेरीमध्ये श्रीमती मंजुषा इधाटे यांनी प्रथम, श्रीमती मिनाक्षी ठाकुर यांनी द्वितीय व श्रीमती अश्विनी ढेकणे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

## सहृदय आभार

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक १६ ते २४ जानेवारी, १४ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा पं.नेहरु स्टेडियम, मध्यवर्ती अग्निशामक केंद्र व सणस स्पोर्टस मैदान येथे संपन्न झाल्या. या स्पर्धांच्या आयोजनामध्ये प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी नियुक्त करण्यात आलेले समन्वयक, उद्घाटन समारंभास उपस्थित प्रमुख पाहुणे, नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक मा. सुभाष पुरी, नेहरु स्टेडियम व सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सेवकवर्गाच्या भरीव सहकार्याचा प्रमुख वाटा होता. या सर्वांकडून भविष्यकाळात याच सहकार्याची अपेक्षा, कामगार कल्याण निधीमार्फत सर्वांचे हार्दिक आभार.

# संपादकीय...

## बचत एक उत्पन्नाचा स्त्रोत

पुणे महानगरपालिकेचे महत्वाचे उत्पन्नाचे साधन म्हणजे कर. कररुपाने मिळणाऱ्या उत्पन्नावर महानगरपालिकेला आपल्या सर्व योजना, सेवकवर्गावरील खर्च भागवावा लागतो. सद्यस्थितीत आयातकर बंद होवून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे. यामुळे महापालिकेची आर्थिक बाजू काहीशी अस्थिर झाली आहे.

आपण दैनंदिन काम करत असताना आपल्या कार्यालयीन कामकाजामध्ये वापरण्यात येणाऱ्या साधनसामग्रीचा सुयोग्य वापर केल्यास महानगरपालिकेची कोट्यावधी रुपयांची आर्थिक बचत होवू शकते. त्यामध्ये कार्यालयीन कामकाजामध्ये वापरण्यात येणारे कागद, संगणक, स्टेशनरी, फर्निचर,वीज, पाणी, इत्यादी बाबींचा काटकसरीने वापर केल्यास त्याचा फायदा प्रशासनास होतो. उदा. निवेदने, अर्ज, टिपणी, इत्यादी तयार करताना ते सरसकट अंतिम टंकलिखित करुन दिल्यास व त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यास केलेले सर्व काम पुन्हा करणे भाग पडते. त्यामुळे अशी कामे करताना कच्च्या कागदावर प्राथमिक निवेदन तयार करुन घेवून व ते वरिष्ठांकडून तपासणी करुन घेतल्यास कागद, शाई व वेळ यांची बचत होते.

कार्यालयांमध्ये सेवक/कर्मचारी उपस्थित नसताना देखील तेथील लाईट, पंखे, विद्युत उपकरणे सर्रास चालू असतात. त्यामुळे महापालिकेला वीज बिलापोटी मोठी रक्कम देणे भाग पडते. यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने दक्षतेने वागल्यास किंवा आपल्या ठिकाणी असलेली विद्युत उपकरणे बाहेर जाताना किंवा त्या ठिकाणी काम करीत नसताना बंद केल्यास आर्थिक बचतच होणार आहे.

कित्येक वेळा महापालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये जुने फर्निचर काढून नवीन फर्निचर केले जाते. जुन्या फर्निचरमध्ये देखील चांगल्या वस्तु असतात. तथापि, अशा वस्तु देखील अडगळीत पडून खराब होतात व त्याचे योग्य ते मुल्य महापालिकेस मिळत नाही. ज्या वस्तु भंगारामध्ये किंवा लिलावामध्ये काढावयाच्या आहेत अशा सर्व वस्तु ताबडतोब लिलाव करुन विकल्यास त्याची चांगली किंमत महापालिकेस मिळू शकते. अशा वस्तु ठेवण्यासाठी महापालिकेला जागेची आवश्यकता भासते. त्याचे जतन करावे लागते. त्यामुळे महापालिकेचा खर्च वाढतो. ही कामे वेळेत झाली तर हा खर्च कमी होणार आहे.

महापालिकेतर्फे मोठमोठ्या वास्तु उभारल्या जातात. त्यासाठी लाखो रुपये खर्च होतात. तथापि, सदर ठिकाणी करावयाची कार्यवाही वेळेवर होत नसल्याने सदरच्या वास्तु विनावापर पडून राहतात व त्या ठिकाणी केलेल्या सोयी सुविधांची नासधुस होते. तेथील सुरक्षेवरचा खर्च नाहक वाढत जातो. त्यामुळे ज्या खात्यांतर्गत सदरहु उपक्रम राबविले जातात त्या खात्यामार्फत वास्तु पूर्ण झाल्यानंतर लगेच कार्यवाही झाल्यास त्याचा सुयोग्य उपयोग होवून महापालिकेचे उद्दिष्ट्य साध्य होवू शकते. तसेच, नाहक खर्च टळू शकतात.

बऱ्याच खात्यांमध्ये काही लोक नाहक गप्पा मारत बसतात. त्यामुळे कार्यालयीन वेळेचा अपव्यय होतो. महापालिकेतील सेवकांनी त्यांच्या कामाच्या वेळेमध्ये त्यांचे कामाबरोबरच अधिनियम, नियम, इत्यादी बाबत वाचन करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यास कार्यालयीन कामकाजाची माहिती होवून सुव्यवस्थापन करण्यामध्ये त्यांचा हातभार लागू शकतो.

सेवकांनी दैनंदिन कामकाज करताना छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष दिल्यास महापालिकेचे खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता सर्व स्तरांवर आर्थिक नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक असून ती काळाची गरज आहे.

महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्याने महापालिकेला बचत हाच पर्याय उपयोगी होणार आहे. भविष्यात बचतीला प्राधान्य देणे आवश्यक ठरणार आहे.

महापालिकेच्या साधन संपत्तीची बचत व योग्य विनियोग केल्यास महापालिका आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल. म्हणूनच बचतीकडे उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहणे आवश्यक आहे.

# अधुरी कथा

– मागील अंकापासून सुरु–

"सांगताना एक ध्यानात ठेव महेंद्र, तुझ्याबद्दल माझ्या मनात तीळमात्रही सहानुभूति नाही आणि तुझ्या बोलण्यामुळे ती येईल असे ही समजू नकोस!"

महेंद्रने त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता दुसरा राउंड संपविला व उठून खुर्चीच्या मागे गेला. खुर्चीवर दोन्ही हात टेकवून भाषणाच्या पवित्र्यात तो म्हणाला,

"तुझा अंदाज अगदी बरोबर आहे सागर ! होय, मी वासंतीचा खुन केलाय मी तिला ठार मारलं! तुझ्या कथेच्या प्लॅनप्रमाणे मी मारलं आणि याचं मला जराही दु:ख होत नाही. रडण्याचे नाटक घरच्यांसाठी करीत होतो. अशी स्त्री की जिच्याकडे कपडेलत्ता, दागदागिने, प्रेमळ व दणकट असा नवरा या गोष्टी असतानाही जर ती स्त्री परपुरुषाबरोबर संबंध ठेवत असेल तर तिला मृत्युचीच शिक्षा योग्य आहे आणि मीही तेच केले. फक्त बावळटनवऱ्यासारखे समोरासमोर मारुन फाशी जाण्याचा मूर्खपणा मी केला नाही. काय नव्हते वासंतीकडे, सांग ना? काय कमी होती तिला? तरीही एका पर पुरुषाबरोबर संबंध ठेवताना तिला जराही लाज वाटली नाही. तिने माझा, माझ्या अब्रूचा जराही विचार केला नाही. मग मी तिला माफ करावं असं तुला का वाटते? माझ्या जागी तु असता तरी तु ही असंच केलं असतस" महेंद्र बोलायचा थांबला.

सागर गडबडला होता. समोर ॲटमबॉंब लावलेला असणार तो फुटणार हे माहित असूनही आवाज आल्यावर बघणारा थोडा दचकतोच, तेच सागरचे झाले होते. महेंद्रने खून केला आहे हे त्याला माहिती होते. पण तो हे असं तडकाफडकी कबुल करील असे त्याला वाटत नव्हते. म्हणूनच थोडा तो हादरला होता. स्वत:ला सावरुन तो म्हणाला,

"अरे पण त्या दिवशी तर आपला संशय फिटला असे तूच म्हणाला होतास ना? मग हे कसं?"

"नाही, नाही. ती माझी चूक होती सागर! नंतर मला सत्य काय ते समजले आणि ते पचवणं मला फार फार अवघड गेलं आणि म्हणून मी मागचा–पुढचा विचार न करता हे केलं आणि याबद्दल मला जराही वाईट वाटत नाही. उलट अजून एक गोष्ट राहून गेली याचं वाईट वाटतय."

"काय राहिलय अजून? आता काय उरलय!" सागर म्हणाला.

"सांगतो! सागर तुला आठवतं तुझी गोष्ट वाचताना मी म्हणालो की ही थोडी अधुरी वाटते म्हणून. तिच्या सध्याच्या प्रियकराला तु विसरलास असं मी म्हणालो होतो. बरोबर? तुझी ती गोष्ट आता मी पूर्ण करतो. ऐक – पत्नीचा खून केल्यावर तुझा हिरो तिच्या सध्याच्या प्रियकराला भेटतो. त्याने केलेल्या कृत्याचा जाब विचारतो. त्याला दारु पाजतो आणि दारुमध्ये विष मिसळून त्याला ठार करतो" बोलत असताना महेंद्र बारकाईने सागरकडे पाहत होता. महेंद्रचे बोलणे ऐकताच सागरने दचकून ग्लासकडे पाहिले व घाबरुन ग्लास ठेवला. हे पाहत महेंद्र मोठ्याने हसला व म्हणाला,

"घाबरु नकोस सागर, मी तुला एवढ्या सहजासहजी नाही मारणार. तुला केल्या कृत्याचा पश्चाताप होईल असं तडफडून मारणार."

"मला? का? का?" सागर घाबरत म्हणाला.

"का? हे मला विचारतोस. हे पहा, मग बोल माझ्याशी! महेंद्रने खिशातून काही फोटो काढून टेबलवर टाकले सागरने ते उचलले. वासंतीचे व सागरचे बागेमधले नको त्या अवस्थेमधले ते फोटो होते. ते पाहून सागरला जबर धक्का बसला. तो काही बोलणार तोच महेंद्र म्हणाला, नीच माणसा! माझ्या संसाराची वाट लावणारा नराधम तुच आहेस तूच! तुला काय वाटलं मला माहिती नव्हते? जेव्हा मी तुझ्याशी प्रथम या गोष्टीबद्दल बोललो तेव्हाच मला हे फोटो मिळाले होते. पण मी मुद्दाम काही बोललो नाही. कारण मी स्वत:चे डोळ्यांनी पाहिले होते. त्यात तू मला वासंतीवर पाळत ठेवण्याचा सल्ला दिलास, तुझ्यावर मला संशय येवू नये म्हणून तु असे केलेस आणि इथेच तु फसलास! कारण त्यानंतर काही दिवस तुम्ही शांत रहाल हे मला माहित होतं. म्हणून तुम्हाला गाफिल ठेवण्यासाठी मी, माझा संशय फिटला असं तुम्हाला भासवलं व लगेच दोन चार दिवसांनी मी मुंबईला जाण्याचे नाटक केलं. पण मी मुंबईला गेलोच नव्हतो! शेजारच्याच मोकळ्या घरात मी चार दिवस राहिलो. भुतासारखा! मी मुंबईला गेलो असे भासवून व माझा संशय गेला असे वाटून तुम्ही दोघांनी चार दिवस जो धिंगाणा घातला तो मी उघड्या डोळ्यांनी पाहिला. त्या दिवशी रात्री चांदण्यात गच्चीवर, उघड्यावर तुम्ही केलेला प्रणय पाहून माझ्या अंगाची लाही लाही झाली होती. वाटलं होतं तसंच जावं नि दोघांना गच्चीवरुन खाली फेकून द्यावे! पण मी स्वत:ला आवरले. सांग, तु

**लेखक : श्री.सुनिल कदम**
**अभियंता, पाणीपुरवठा विभाग**

हे काय केलेस? का? एका चंचल स्त्रिसाठी तु आपल्या मैत्रीला विसरलास?" महेंद्र बोलायचा थांबला. त्याने अजून एक ग्लास संपवला. एव्हाना सागरनेही त्याचा ग्लास संपवला होता. तो घाबरला होता.

"कारण वासंती माझी प्रेयसी होती. जातीमुळे आम्हाला लग्न करता आलं नव्हतं. हे मी तुला मागं सांगितलच होतं. पण तिचं नाव सांगितलं नव्हतं एवढच! आणि योगायोगाने तुझ्या पत्नीच्या रुपाने ती माझ्या समोर आली आणि त्यामुळेच आमच्या मनाचा तोल ढळला." सागर म्हणाला.

"अरे मुर्ख माणसा! मला आधी बोलला असतास तर मी स्वत:हून तुमच्या मार्गातून बाजूला झालो असतो"

"नाही महेंद्र नाही, ते शक्य नव्हतं ते कदापिही शक्य नव्हते."

"शक्य नव्हतं की तुला ते नको होतं" कोणतीही जबाबदारी न घेता वासंतीच्या नवरेपणाचं सुख तुला घरबसल्या मिळावं म्हणून! सागर, हे मी चांगलं ओळखून आहे." महेंद्र म्हणाला.

"नाही महेंद्र नाही. तुझा गैरसमज होतो आहे. आमच्या दोघांमधला हा एक गाफिल क्षणाचा परिणाम होता आणि त्यातच आम्ही अडकत गेलो."

"तुझ्या उघड्या पडलेल्या पापाला शब्दांचे कपडे घालून झाकण्याचा प्रयत्न करु नकोस सागर! तु माझा गुन्हेगार आहेस आणि तुला मी मारणार आहे. यात आता बदल होणार नाही."

असे म्हणून महेंद्रने खिशातून पूर्णपणे कापसात गुंडाळलेली किटकनाशकाची बाटली काढली व तो शांतपणे सागरकडे येवू लागला. महेंद्र तब्येतीने सागरपेक्षा दणकट होता. त्याने काही करायचे ठरवले असंत तरी सागर प्रतिकार करु शकला नसता. म्हणून सागर घाबरला, थरथर कापत याने म्हटले "नाही महेंद्र, नाही मला माफ कर, मी चुकलो महेंद्र मी चुकलो! आणि मला मारुन तु ही सुटशील असं समजू नकोस, कारण माझा मृत्यु ही आत्महत्या नसून खून आहे हे पोलिसांना बरोबर समजेल."

हे ऐकून महेंद्र मोठ्यांदा हसून म्हणाला "याचा मी विचार केला नाही असं तुला वाटते का? मग ऐक तुझ्या कथेतील तिच्या प्रियकराने आत्महत्या करताना लिहिलेली चिठ्ठी आठव. पुन्हा तेच वाचून दाखवतो."

"मी पूर्ण विचारांति आत्महत्या करीत आहे. माझ्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीच्या अकल्पित निधनाने मी खचून गेलो आहे. तिचा पति मला नुकताच भेटून गेला. तिच्या मृत्युने त्यालाही दु:ख झालेले दिसले. तिचे व माझे पूर्वीचे संबंध माहित असूनही त्याने तिला माफ केले, तिच्यावर पूर्वी एवढेच प्रेम केले, तिच्या मृत्युने त्याला झालेले अपार दु:ख, त्याच्या मनात दाटलेली विरहाची भावना हे सर्व तिच्या चांगुलपणाची, मोठेपणाची ग्वाही देतात. केवळ माझ्याशी लग्न केले नाही म्हणून मी तिला आतापर्यंत वाईट समजून तिला नाना प्रकारे दोष देत होतो, चंचलवृत्तीची समजत होतो याबद्दल मला आता वाईट वाटत आहे. ती फार चांगली होती! आमचे प्रेम हे ईश्वराला मान्य नसावं! त्यामुळे आमचे मिलन या जगात नाही तर वरच्या जगात होईल या आशेवर मी आत्महत्या करीत आहे. याबाबत कोणालाही दोषी धरण्यात येवू नये."

एव्हाना तुझी कथा मी नष्ट केली आहे हे तुझ्या लक्षात आले असेलच. पण ते करण्यापूर्वी तुझ्या अक्षरातील ही चिठ्ठी असलेले पान मी व्यवस्थित काढून घेतले. माझ्या सुदैवाने आणि तुझ्या दुर्दैवाने तु लिहताना पाठोपाठ लिहिले नाहीस यामुळे ती चिठ्ठी एका स्वतंत्र कागदावर लिहिली गेली, आठवतय का तुला? या चिठ्ठीमध्ये तु कोणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाहीये आणि ही चिठ्ठी तुझ्याच हस्ताक्षरातील आहे. राहता राहिला चिठ्ठीखाली तुझ्या सहीचा प्रश्न? तो पण मी सोडवला. तु कथा लेखक म्हणून खाली जी सही केलीस तीच सही तुम्ही इंजिनियरिंगचे विद्यार्थी जसे जी.टी.मारता ना तशी जी.टी.मारुन या चिठ्ठीवर उतरविणे मला फारसे अवघड गेले नाही. यामुळे ही चिठ्ठी तुच लिहिली आहेस असेच सर्वांना वाटणार! तेव्हा आता सर्व शंका फिटल्या असतील तर "हो मरणाला तयार!" असे म्हणून महेंद्रने किटकनाशकाची बाटली टिपॉयवर ठेवून एका झेपेत सागरला पकडले. त्याला खाली पाडून दोन्ही गुडघे त्याच्या दोन्ही दंडांवर ठेवून एका हाताने त्याचे तोंड दाबले. दुसऱ्या हाताने बाटली घेवून ती सागरच्या तोंडात उपडी केली.

सागर औषध बाहेर थुंकत होता. महेंद्रने त्याचे नाक दाबून धरले. सागरनं बराच प्रतिकार केला पण तालीम केलेल्या महेंद्रच्या दणकट शरीरापुढे त्याचे काहीच चालले नाही. थोड्याच वेळात हातपाय झाडत सागर शांत झाला.

सागर गेला याची खात्री करुन महेंद्र उठला. शांतपणे त्याने पिशवीतून ग्लोव्हज काढून हातात घातले. पाठीमागून काखेत हात घालून त्याने सागरला खुर्चीत बसविले. सागरचा डावा हात त्याच्या मांडीवर ठेवला. उजवा हात खुर्चीबाहेर लोंबकळत ठेवला. उजव्या हाताच्या खाली बाटलीतील थोडे शिल्लक असलेले औषध सांडले. बाटलीवरचा कापुस काढून त्याने ती बाटली सागरच्या उजव्या हातात ठेवून, त्याची बोटे व अंगठ्याचा ठसा बाटलीवर उमटेल अशा प्रकारे दाबली. नंतर ती बाटली त्याच्या उजव्या हाताखाली आडवल ठेवून दिली. सागरची मान त्याने उजव्या बाजूला कलती केली. नंतर एकवार सागरकडे नजर टाकून तो उठला. त्याने घेतलेला ग्लास व बाटली त्याने पिशवीत टाकली. खुर्ची, टिपॉय, पाण्याचा जग, सोड्याची बाटली यावर उमटलेले स्वत:चे ठसे त्याने पुसून काढले. पिशवीतून एक छोटी दारुची बाटली काढून त्याने ती सागरने घेतलेल्या ग्लासशेजारी ठेवली. त्या दारुच्या बाटलीवर सागरचे ठसे उमटवले. टिपॉय साफ करुन डिशमध्ये थोडे फरसाण होते ते तसेच ठेवून तो उठला.

खिशातून ती चिठ्ठी काढून त्याने तशीच घडी मारुन ती टिपॉयवर ठेवली. सागरच्या स्टडी टेबलवरचा पेन उचलून त्याने तो त्या चिठ्ठीवर ठेवला. एकवार सर्वत्र नजर फिरवून काही राहिलं नाही याची खात्री करुन महेंद्रने दार उघडले. बाहेर एक नजर फिरवून कोणीही नाही याची खात्री करुन तो पिशवी घेवून बाहेर पडला. दार बंद करुन तो दाराच्या कडीवर पाय देवून वर चढला व व्हेंटीलेटरमधून हात घालून त्याने आतली वरची कडी लावली. व्हेंटीलेटर पूर्ववत बंद करुन तो खालीत उतरला. दार थोडे ढकलून कडी व्यवस्थित लावली आहे की नाही याची खात्री केली. ग्लोव्हज काढून पिशवीत टाकले. नंतर शांतपणे तो चालू लागला. सागरची कथा त्याने पूर्ण केली होती!

## क्रिकेटमध्ये मनपा भवन क्र. २ संघ विजेता

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धा दिनांक १६ ते २४ जानेवारी या कालावधीत पं.नेहरु स्टेडियम येथे पार पडल्या. यामध्ये एकूण १२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेतील साखळी सामने एकूण १५ षटकांचे तसेच उपांत्य व अंतिम सामना २० षटकांचा खेळविण्यात आला. यामध्ये मनपा भवन क्र.२ आणि उप आयुक्त क्र. ३ या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करुन अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामना दि.२४ जानेवारी रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाला. यामध्ये मनपा भवन क्र. २ या संघांने विजय प्राप्त करुन अजिंक्यपद मिळविले तर उप आयुक्त क्र. ३ या संघास द्वितीय क्रमांक मिळाला. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून श्री. अब्दुल मुजावर, उत्कृष्ट फलंदाज म्हणून श्री. संदिप पाटोळे, मॅन ऑफ द मॅच व मॅन ऑफ द सिरीज म्हणून श्री. देवदत्त देवकर यांची निवड झाली. सामन्यांच्या यशस्वी आयोजनात व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम, मा.सुभाष पुरी, श्री.प्रदीप महाडिक, श्री.देवदत्त देवकर, श्री.गणेश मांजरे, श्री.लक्ष्मीकांत शिंदे, श्री.निलेश चव्हाण, श्री.जितेंद्र बागे, श्री.कृष्णा बगाडे, श्री.मोहन कुलकर्णी, श्री.मल्हारी माकर, श्री.अरुण चांदणे, श्री.गोविंद पळसकर, पं. नेहरु स्टेडियम येथील कर्मचारी यांचा मोलाचा वाटा होता.



## स्लो सायकलिंगमध्ये कमलनयनसिंग मल्होत्रा प्रथम

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये दिनांक १६ जानेवारी, २०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे स्लो सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ४८ सेवकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १६/१/२०१४ रोजी सकाळी १० वाजता झाला. या स्पर्धेमध्ये श्री. कमलनयनसिंग मल्होत्रा यांनी प्रथम क्रमांक, श्री. राहीन आतार द्वितीय क्रमांक व श्री. रविराज बेंद्रे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्री. सुनिल दरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



## संगित खुर्ची, गोळा फेक, १०० मी. धावणे व थ्रो बॉल स्पर्धेस महिलांचा सहभाग

### पुणे मनपा सेवकांमधील सर्वात वेगवान महिलेचा मान सोनाली गारगोटे व वैशाली शिंदे यांना

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक १८/१/२०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे फक्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संगित खुर्ची, १०० मी. धावणे, गोळा फेक व थ्रो बॉल स्पर्धेस महिला सभासद सेवकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संगीत खुर्ची स्पर्धेमध्ये श्रीमती शुभांगी पारटे यांनी प्रथम, श्रीमती सना शेख यांनी द्वितीय व श्रीमती वनिता दरपले यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. १०० मी. धावणे स्पर्धेमध्ये १८ ते ३५ वयोगटात श्रीमती सोनाली गारगोटे यांनी प्रथम, श्रीमती सुप्रिया ताम्हाणे यांनी द्वितीय व श्रीमती विद्या शिरस यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. ३५ च्या पुढील वयोगटात श्रीमती वैशाली शिंदे यांनी प्रथम, श्रीमती दिपांजली निकत यांनी द्वितीय व श्रीमती पूजा देशमुख यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. गोळा फेक स्पर्धेमध्ये श्रीमती तनुजा रावळ यांनी प्रथम, श्रीमती मंगल सोनवणे यांनी द्वितीय व श्रीमती सुरेखा ताजणे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. थ्रो बॉल स्पर्धेमध्ये श्रीमती वर्षा तनपुरे यांनी प्रथम, श्रीमती वर्षा राडे यांनी द्वितीय व श्रीमती वैशाली शिंदे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्रीमती रसिका निघुट, श्रीमती राधिका जगताप, श्रीमती वृषाली गायकवाड, श्रीमती मिनाक्षी ठाकुर व श्रीमती सुप्रिया परदेशी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## कबड्डी,व्हॉलीबॉल व बॅडमिंटन स्पर्धांमधील विजेते

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित स्पर्धांतर्गत दिनांक २० व २१ जानेवारी, २०१४ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कोंढवा वानवडी क्षेत्रीय कार्यालयाने प्रथम क्रमांक, सांख्यिकी व संगणक विभागाने द्वितीय क्रमांक मिळविला.

दिनांक २२ ते २४ जानेवारी, १४ रोजी मध्यवर्ती अग्निशामक केंद्र, भवानीपेठ येथे व्हॉलीबॉल (पासिंग व शुटिंग) स्पर्धा आयोजित करण्यात आली. व्हॉलिबॉल पासिंगमध्ये अग्निशामक (अ) विभागाने प्रथम व अग्निशामक (ब) विभागाने द्वितीय क्रमांक पटकाविला. व्हॉलिबॉल शुटींगमध्ये अग्निशामक (अ) विभागाने प्रथम व सिंहगड अग्निशामक केंद्राने द्वितीय क्रमांक मिळविला. व्हॉलिबॉल पासिंगमध्ये बेस्ट प्लेयरचा मान श्री. संदिप घडशी यांनी तर व्हॉलिबॉल शुटींगमध्ये बेस्ट प्लेयरचा मान श्री. संजय जाधव यांनी पटकाविला.

बॅडमिंटन स्पर्धांचे दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी सणस स्पोर्ट्स क्लब येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुरुष व महिला असे दोन विभागांमध्ये व पुरुष एकेरी व दुहेरी तसेच महिला एकेरी अशा स्पर्धा घेण्यात आल्या. पुरुष एकेरी गटामध्ये श्री. नितीन देशपांडे यांनी प्रथम, श्री. रामचंद्र शिंदे यांनी द्वितीय तर श्री. अश्विन शिंदे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. महिला एकेरी गटामध्ये श्रीमती जया सांगडे यांनी प्रथम, श्रीमती वैशाली शिंदे यांनी द्वितीय तर श्रीमती अरुणा जाधव यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.








## माहे जानेवारी २०१४ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/१/१४ रोजी कॅ. वडके हॉल येथे जानेवारी,१४ मधील सेवानिवृत्त २४ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १८ वयपरत्वे



व ६ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री गणेश सोणुने आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे उपस्थित होते. तसेच, श्री.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा.तुकाराम जगताप, सचिव, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, सेवानिवृत्त संघाचे मा. बाबा शेख व मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस श्री. केंजळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ आयोजनाचे महत्व विषद करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तदनंतर मा. श्री.बापू पवार व श्री. तुकाराम जगताप यांनी सेवानिवृत्तांना मार्गदर्शन करुन उर्वरित आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्तांपैकी श्री. रमेश अत्रे, विभाग प्रमुख, धनकवडी क्षेत्रीय कार्यालय, श्री. तुकाराम बांबेरे, सरलेखनिक, सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय व श्रीमती यशोदा रामारफ, सिनिअर स्टेनोग्राफर, उप आयुक्त (ज) कार्यालय यांनी मनपा सेवेबाबत अभिमान असून, केलेल्या सेवेचे समाधान असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुणे मा.श्री.गणेश सोणुने यांनी सेवानिवृत्त सेवकांनी केलेल्या सेवेबद्दल महानगरपालिकेतर्फे आभार मानले व सर्व सेवानिवृत्त सेवकांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. घोलप, श्री.राजपुरे, श्री.गेजगे, श्री. कांबळे व श्री. कारभळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

कल्याणवार्ता
जानेवारी, २०१४
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/ १२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar@punecorporation.org

## कारण रिटायर मी होणार

आयुष्याच्या ह्या महानाट्यातील
पर्व एक संपणार
कारण, रिटायर मी होणार
रोजची ती कसरत
कामाचा तो व्याप
सारे काही थांबणार
कारण, रिटायर मी होणार
सहकाऱ्याची ती साथ
वरिष्ठांची ती जरब
हे आता सर्व नसणार
कारण, रिटायर मी होणार
सर्वांच्या त्या आठवणी
नेहमीच्या त्या सवयी
आता फक्त स्मरणात राहणार
कारण, रिटायर मी होणार
जीवनाच्या ह्या पर्वातील
गोड, कटू अनुभवाची गाथा,
उराशी ती कवटाळून ठेवणार
कारण, रिटायर मी होणार
आयुष्याच्या संध्याकाळी
गाठीशी माझ्या शिदोरी
तीच जगण्याची माझ्या उमेद राहणार
कारण, रिटायर मी होणार।

**गिरीष सुदामराव बहिरट**
**कर आकारणी व कर संकलन विभाग**

## १०० मिटर धावणे, लांबउडी व गोळा फेक स्पर्धेस उत्स्फूर्त सहभाग

### पुणे मनपा सेवकांमधील वेगवान पुरुषाचा मान श्री. निखिल कोहरे व श्री. अनंत टोले यांना







क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने दिनांक १८ जानेवारी रोजी पं.नेहरु स्टेडियम येथे १०० मिटर धावणे, लांबउडी आणि गोळा फेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वय वर्ष १८ ते ३५ या गटामध्ये श्री. निखील कोहरे यांनी प्रथम , श्री. कृष्णा बगाडे यांनी द्वितीय तर श्री. मंगेश पानसरे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. वय वर्ष ३५ च्या पुढील गटातून प्रथम क्रमांक श्री. अनंत टोले, द्वितीय क्रमांक श्री. शरद मरकड तर तृतीय क्रमांक श्री. जयवंत भांडवलकर यांनी प्राप्त केला.

लांबउडी स्पर्धेमध्ये १८ ते ३५ या वयोगटामध्ये श्री. संदिप शिंदे यांना प्रथम क्रमांक, श्री. विशाल यादव यांना द्वितीय क्रमांक व श्री. अनिमिष कोंडगेकर यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. वय वर्ष ३५ च्या वरील गटामध्ये श्री. अनंत टोले यांना प्रथम क्रमांक, श्री.शरद मरकड व श्री. नितीन केंजळे यांना द्वितीय क्रमांक व श्री. प्रदिप रसाळ यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. गोळाफेक स्पर्धेमध्ये वय वर्ष १८ ते ३५ या गटामध्ये श्री. पंकज इंगवले यांना प्रथम क्रमांक, श्री. संदिप शिंदे यांना द्वितीय क्रमांक व श्री. अमित शिंदे यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. वय वर्ष ३५ च्या वरील गटामध्ये श्री. प्रसाद वाळुंजकर प्रथम क्रमांक, श्री. शरद मरकड यांना द्वितीय क्रमांक व श्री. विकास घुले यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्री. अविनाश पंढरी व श्री. सुनिल दरेकर यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

## मैत्री

अशी असावी सुंदर मैत्री,
जिथे असावा प्रेमळ गंध ।
स्वार्थाला ना जिथे प्रवेश,
भक्त-भक्तीचा गोड सुगंध ।।१।।
तुझे नि माझे नसे वेगळे,
सारे सारे वाटुन घेवू ।
सुख-दु:खाला,क्षणा-क्षणाला
एकमेकांस साथही देवू ।।२।।
जरी वेगळे जगत राहिलो,
क्षणा-क्षणाला आठवण येईल ।
कधी भेटतो ऐकमेका,
मनी सारखे वाटत राहील ।।३।।
कधी बसावे शांत स्थळी त्या,
जुन्या स्मृतींची धून आळवीत।
हरपून जावे क्षणभर सारे,
सुगंधीत ते श्वास जुळवीत ।।४।।
असे आपुले मैत्रबंध हे,
नजर न लागो त्यास कोणाची ।
साक्ष काढून मना-मनांची,
जोडून घेवू अक्षय नाती ।।५।।

**श्री. लक्ष्मण पाषाणकर**

## रांगोळी स्पर्धेमध्ये अरुणा जाधव प्रथम

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी मनपा मुख्य भवनामध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ६ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक २१/१/१४ रोजी सकाळी १० वाजता झाला. या स्पर्धेमध्ये श्रीमती अरुणा जाधव यांनी प्रथम क्रमांक, श्रीमती स्मिता कठाळे यांनी द्वितीय क्रमांक व डॉ. केतकी घाटगे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्रीमती रसिका निघुट, श्रीमती राधिका जगताप, श्रीमती वृषाली गायकवाड, श्रीमती मिनाक्षी ठाकुर व श्रीमती सुप्रिया परदेशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय पातळीवर पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थीनींना रौप्य पदक

सायन्स सोसायटी ऑफ इंडिया अंतर्गत इंडिया सायन्स ॲन्ड इंजिनियरिंग फेअर तर्फे राष्ट्रीय पातळीवर चेन्नई येथे आयोजित केलेल्या विज्ञान प्रकल्प स्पर्धेत पुणे मनपाच्या हुतात्मा बालवीर शिरीषकुमार माध्यमिक विद्यालयातील कु.धनश्री शेळके व कु.प्रगती भोकरे, इयत्ता दहावी यांची निवड झाली. सदर स्पर्धेमध्ये आलेल्या एकूण ३१ प्रकल्पांमधून या विद्यार्थीनींच्या Owl Inspired Aircraft Wing Design या प्रकल्पाची अंतिम निवड होवून त्यांना रौप्य पदक व प्रशस्तीपत्रके मिळाली.

विज्ञान स्पर्धेकरिता कु.शेळके व कु..भोकरे यांना श्रीमती अमृता कुलकर्णी, एन.सी.एल., पाषाण, श्रीमती नीता गुळवणी, विज्ञान शिक्षिका व श्रीमती संध्या जाधव, शालाप्रमुख यांनी मार्गदर्शन केले. दिनांक १० व ११ जानेवारी, २०१४ रोजी चेन्नई येथील अग्नि कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी येथे सदर स्पर्धा घेण्यात आली. डॉ.एच.देवराज, उपाध्यक्ष, यु.जी.सी, नवी दिल्ली यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.